# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ११/०५/२०२४ (शनिवार) दुपार**


## अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

दि. १०/०५/२०२४ रोजी पोस्टे कुही येथील स्टाफ पो.स्टे. परीसरात पेट्रोलींग करीत असता गुप्त बातमीदारा द्वारे खबर प्राप्त झाली की, मौजा खेंडा येथील इसम युवराज सिंधीमेश्राम हा मौजा चापेगडी येथुन मोटार सायकलने अवैध्यरित्या देशी दारु वाहतुक करीत आहे. अशा विश्वसनीय खबरेवरुन मौजा साळवा शिवारातील चापेगडी ते साळवा ते राजोला रोडवरील टी—पॉइंटवर जावुन नाकाबंदी केली असता मोटरसायकल क्र. MH-36/AK-8017 चा चालक **आरोपी नामे— युवराज ईसतारी शिंधीमेश्राम वय ३१ वर्ष, रा. वार्ड नं. ०१ खेडा ता. कुही जि. नागपुर** त्याचे मोटार सायकलवर असलेल्या पिवळया रंगाच्या प्लॅस्टीक चुंगडीमध्ये ९० एम एल च्या देशी दारू भिंगरी संत्रा नं. १ च्या २०० निपा प्रत्येकी किंमत ३५/— रू एकुण ७०००/— रू. चा मुद्देमाल वाहतुक करतांना मिळुन आल्याने आरोपीचे ताब्यातून मोटरसायकल क्र. MH-36/AK-8017 किंमती ८०,०००/— रुपये, ९० एम एल च्या देशी दारू भिंगरी संत्रा नं. १ च्या २०० निपा प्रत्येकी किंमत ३५/— रू एकुण ७०००/— रू. असा एकुण ८७,०००/— रु.चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीविरूद्ध कलम ६५ (ई), (अ) म.दा.का. प्रमाणे गुन्हा नोंद केला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. हर्ष पोद्दार पोलिस अधिक्षक सा. नागपूर ग्रामीण, मा. रमेश धूमाळ अपर पोलीस अधिक्षक यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे कुही येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक भानुदास पिदुरकर पोउपनी सोनकुसरे, पोना रोशन नारनवरे, पो.अ. आशिष खंडाईत, रविंद्र मारबते यांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर